**MHKO100010802023**

## नियमीत दिवाणी दावा क्र.२०९/२०२३ मधील निशाणी क्र.२५ वर आदेश

प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत व म्हणणे” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**३.** प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, कैफियत व म्हणणे देण्यासाठी आवश्य असलेली कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने त्यांना कैफियत व म्हणणे देता आले नाही. तसेच दाव्यासंबंधी आवश्यक असणारी कागदपत्रे व नक्कला वेळेत उपलब्ध करून वकिलांना देता आली नाहीत. प्रतिवादी यांना त्यांचे व्यावसायिक व्यापामुळे व कायदयाचे ज्ञान नसल्याने कैफियत व म्हणणे देण्याचे राहून गेले आहे. कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळाल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही याउलट तसे न झाल्यास प्रतिवादी यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. प्रतिवादी यांनी कैफीयत व म्हणणे देण्यास जाणून बुजून टाळाटाळ केलेली नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांनी अर्जामध्ये नमूद केलेली कारणे चुकीची व खोटी आहेत. कैफियत व म्हणणे मुदतीत दाखल केले नाही. प्रतिवादी यांनी दावा लांबवण्यासाठी जाणुनबजुन कैफियत व म्हणणे दाखल केलेले नाही. प्रतिवादी यांचेकडे कोणतेही कागदपत्रे नाहीत. मे. न्यायालय अर्ज मंजूर करणेच्या निष्कर्षाप्रत आल्यास प्रतिवादी यांचे जास्तीत जास्त खर्च बसवणेत यावा.

**५.** वादी यांनी सदरचा दावा कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांना दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दिनांक २७/०९/२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले. त्यानंतर मे. न्यायालयाने प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांनी अभिलेखावर कैफियत व म्हणणे वेळेत दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरूध्द दिनांक ०६.०२.२०२४ रोजी कैफियत व म्हणणे नाहीचा आदेश पारीत केला. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०४.०९.२०२४ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर काहीअंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१)** प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ४००/- (अक्षरी रुपये चारशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.10.11 12:06:16 +0530

**ठिकाण – गडहिंग्लज**
**दिनांक १०/१०/२०२४**

**डी. एम. पवार**
**दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.**
**गडहिंग्लज**